साप्ताहिक

# न्यायस्वातंत्र्य समता

संपादक - रमेश अ. शेळके | कार्य. संपादक - ॲड. चंद्रकांत गायकवाड | RNI NO. : MAHMAR /2010/36016

वर्ष ६ वे | अंक ३१ वा | सोमवार दि. २९ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर २०१६ | किंमत - २ रुपये | पाने ४

# पत्रकारिता प्रमाणपत्र सोहळा उत्साहात संपन्न!





पुणे (प्रतिनिधी) - साप्ताहिक न्यायस्वातंत्र्य समता व बहुजन ज्येष्ठ नागरिक संघ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमाणपत्र वितरण सोहळा सानेगुरूजी सभागृहात दिमाखात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला सांजसंगीत कलामंच प्रस्तुत गीतांची बरसात श्रावण सरी हा बहारदार गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना ॲड. चंद्रकांत गायकवाड, साप्ताहिक नगरसेवा टाईम्स चे संपादक शिवराम कांबळे, दैनिक आपल्या सम्राट चे संपादक योगेश आल्हाअ, सा. समीक्षा टाईम्सचे संपादक सुहास बनसोडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

आपला सम्राट व प्रेरणाज मिडिया यास कम्युनिकेशन्सच्या वतीने ४ महिन्यांचा पत्रकारिता प्रशिक्षण वर्ग २० मार्चपासून न्यू मिरजकर गॅरेज कॅम्पसमध्ये घेण्यात आले. या प्रशिक्षणात विविध भागातील, वेगवेगळ्या वयोगटातील १५ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला व अभ्यासक्रम पूर्ण केला. (पान ४ वर)

# विधानसभा निवडणूक बंदोबस्तात सहभागी पोलिसांना एक महिन्याचे वेतन : मुख्यमंत्री



मुंबई : लोकशाहीच्या विकासासाठी कायद्याचे राज्य आवश्यक असून त्यासाठी महाराष्ट्र पोलीस दलाने जबाबदारी चोख पार पाडून महाराष्ट्राच्या प्रगतीचे शिलेदार होण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. २०१४ च्या विधानसभा निवडणूक बंदोबस्तासाठी कार्यरत असणाऱ्या राज्यातील पोलिसांना एक महिन्याच्या मूळ वेतनासाठी ८.९६ कोटी तर मुंबई पोलिसांना १.६४ कोटी रुपये देण्याची महत्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

महाराष्ट्रातील पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक गुन्हे परिषद मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृहात पार पडली. यावेळी ते बोलत होते. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री दीपक केसरकर, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव के. पी. बक्षी, डॉ. विजय सतबीर सिंह, प्रधान सचिव रजनीश सेठ, पोलीस महासंचालक सतीश माथूर, मुंबईचे पोलीस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांच्यासह राज्यातील पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सोशल मिडीयाच्या गैरवापरातून तरुणांना चुकीच्या गोष्टींकडे ओढले जात आहे. यासाठी पोलीस दलाने जनतेत राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्यासाठी समाजातील वेगवेगळ्या घटकांशी विचारविनिमय करावा. सर्वमान्य राष्ट्रीयतेच्या बाबींचा वापर करुन जनतेत सलोखा राखण्याचे काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

तंत्रज्ञानाधारित अन्वेषण प्रक्रियेसाठी सीसीटीएनएस प्रणाली : आदिवासी भागासाठी शासन चांगल्या योजना राबवित असल्यामुळे या भागातील नक्षलवाद रोखण्यात यश येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, याबाबतीत शहरांकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे. विविध गुन्ह्यांमध्ये साक्षीदार बदलतात, यापुढे मानवी साक्षीवर फारसे अवलंबून न राहता तांत्रिक साक्षींवर भर द्यावा लागणार आहे. यासाठी राज्यात फॉरेन्सिक लॅबची संख्या वाढविण्याबरोबरच त्यांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. आधुनिक काळात राज्याचे पोलिसिंग तंत्रज्ञानाधारित होण्यासाठी राज्यात सीसीटीएनएस प्रणाली राबविण्यात येत असून सायबर लॅबची स्थापना करण्यात आली आहे.

दोषारोप सिद्धीचा दर ३३.५ टक्क्यांवर : आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे राज्यात सन २०१४ मध्ये असलेला दोषारोप सिद्धीचा दर १९.३ टक्क्यांवरुन ३३.५ पर्यंत वाढला आहे. याबद्दल मुख्यमंत्र्यांनी सर्व पोलीस अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

पंतप्रधान आवास योजनेतून पोलिसांसाठी घरे : गुन्ह्यांची बदलती पद्धती लक्षात घेऊन पोलिसांनीही आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेणे (पान ३ वर)

सुवर्ण संधी ! सुवर्ण संधी !! सुवर्ण संधी !!!

0% व्याज

कोकणातील निसर्गाच्या सानिध्यातील एक सुंदर प्रकल्प !
उत्तम भविष्यासाठी.... एकमेव पर्याय.... जमिनितील गुंतवणुक

AIAO-BAR QMS ACCREDITED

निसर्गरम्य आणि प्रदुषण विरहित मंडणगड व महाड या कोकण परिसरात सर्व सामान्य जनतेसाठी परवडेल अशा त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी व्हीजन सिटी लँण्डमार्क प्रा. लि. यांच्यावतीने स्वत:च्या हक्काच्या जमिनीचे मालक व्हा !

## व्हिजन सिटी लॅण्डमार्क प्रा. लि.

ISO 9001:2008

## नवनिर्मित द ग्रीन स्टोन फार्म

पुणे स्टेशनपासून अंदाचे १६० किमी. अंतरावर रायगड, रत्नागिरी, हरिहरेश्वर बीज, मंडणगड या निसर्गरम्य परिसरात स्वस्त दराने व सुलभ हप्त्याने शेत जमिन, भव्य बंगलो, एन.ए. प्लॉट उपलब्ध आहे.

**प्लाटॅची वैशिष्ट्ये**

१) २० फुटी अंतर्गत रस्ते.
२) क्लिअर टायटल प्रॉपर्टी.
३) सुलभ हप्त्याची सुविधा.
४) मुंबई- गोवा एस. एच. १०० पासुन ४ कि. मी.
५) हरणे बीज ३५ कि. मी.
६) हरिहरेश्वर ४५ कि. मी.
७) मंडणगड एम.आय.डी.सी. पासुन १ कि.मी.
८) करंजवाडी रेल्वे स्टेशन ५ कि. मी.

**ग्रीन स्टोन फार्म फेज-३**

| | |
|---|---|
| ५,००० स्क्वे फू. (५ गुंठे) | र. २,00000/- |
| बुकींग | रू. २५,०००/- |
| उर्वरीत रक्कम | रु. १,७५,०००/- |
| % व्याजदराने | रु. ४,०००/- |
| ४४ महिने. | ४४ मसिक हप्ता |

रु. १० लाख प्रति एकर
काजु व आंब्याच्या लागवडीसह
बुकिंग रक्कम रु. १०,०००/-
अगाऊ रक्कम रू. ३ लाख
उर्वरीत रक्कम ५५ हप्त्यामध्ये प्रति हप्ता
रु. १५,०००/- तेही ०% व्याजदराने

ऑफर फक्त मर्यादित कालावधीसाठी
नियम व अटी लागु
ऑफिसवरून साईट पाहण्यासाठी गाडीची सोय

अधिक माहितीसाठी त्वरीत संपर्क साधा : व्हिजन सिटी लॅण्डमार्क प्रा. लि.
रजि. ऑ: मेरीविल्ला, स. नं. ७८/४/१, संत गजानन महाराज नगर, रस्ता नं. २, भोसरी आळंदी राड, दिघी, पुणे.

ब्रँच ऑफिस : ४३१/ अ, शॉप नं. १३, सिध्दिविनायक केशर कॉम्प्लेक्स, सोमवार पेठ, नरपतगिरी चौक, पुणे ११. फोन: ०२०-४१२३११२२

ब्रँच ऑफिस : गणेशा मंदिरा शेजारी, रोड नं. १०, गणेशनगर, बोपखेल, पुणे-३१. फोन: ०२०-६५३१११२२.

संपर्क : रमेश शेळके : 8554891279

Website : www.visioncitylandmark.in, E-mail : visioncitylandmarkpvtltd@gmail.com

जाहिरातीचे कात्रण घेऊन बुकींग केल्यास १००० रुपयाची सुट मिळेल

# संपादकीय ...

## तरूणाई तुला सलाम....

**नुकताच पंरपरांगत पध्दतीने दहीहंडी उत्सव सोहळा मोठ्या दिमाखाने संपूर्ण भारतात पार पाडला गेला. यंदा कोर्टाने २० फुटांच्या वर दहीहंडी बांधू नये असे स्पष्ट आदेश दिले होते.**

**ज्या ज्या मंडळांनी सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार उत्सव साजरा केला. त्यांच्या देश निष्ठेला सलाम.**

**काही अपवाद वगळता अवघ्या भारतीय तरूणाईंनी राज्यघटनेचा सन्मान करत, कोर्टाचा आदेश शिरोधार्य मानत उत्सव साजरा करून एकप्रकारे देशाला मानवंदना दिली. असेच म्हणता येईल.**

**दहीहंडी उत्सवानिमित्त अवघी तरूणाई रस्त्यावर उतरली आणि त्यांच्या उत्साहात भर घालण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अबाल-वृध्दांबरोबरच, महिलांसमवेत बच्चे कंपनीनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी करत त्यांचा उत्साह वाढवला. संपूर्ण भारतात हेच चित्र होते. गेल्यावर्षी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळाचे साम्राज्य होते. संपूर्ण महाराष्ट्रातील जनता, पाण्यासाठी वणवण भटकत होती. काही जिल्ह्यांमध्ये पिण्याचे पाणी आठवड्याला मिळत होते. तेव्हा ही ह्याच तरूणाईंनी पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी दहीहंडी उत्सव साजरा न करण्याचा निर्णय घेऊन महाराष्ट्रातील जनतेच्या दुःखामध्ये आम्ही सहभागी आहोत हे दाखवत माणूसकी जपली होती. अशा या समंजस तरूणाईची वाहवा करण्यासाठी जनता आतुरतेने वाट पाहत होती.**

**यंदा संपूर्ण महाराष्ट्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने व महाराष्ट्रावरील पाण्याचे संकट टळल्याने, याच जनतेने मोठ्या उत्साहात या तरूणाईला सोबत केली व आनंद लुटला.**

**समंजस तरूणाई व जनतेचा हा एकमेकांप्रती असलेला विश्वास एकमेकांप्रती असलेली समर्पणाची भावना, त्यांच्यातील नाते अधिक घट्ट करून जाते.**

**दहीहंडी पाठोपाठ या तरूणाईला 'गणेशोत्सव' खुणावतो आहे. दहीहंडीचा एक दिवसाचा थरार आणि गणेशोत्सव हे तरूणाईचे खास आकर्षण.**

**सतत दहा दिवस भक्तीमय मार्गाने गणेशोत्सव साजरा करणारी ही तरूणाई. या दिवसांमध्ये तमाम भारतीयांचे डोळ्याचे पारणे फेडणारी रोषणाई करून, हळुच तमाम जनतेला माणुसकीचा, आपलेपणाचा, विशेषतः प्रबोधनाचा देखावा सादर करून त्यांना चिमटे काढण्याचा प्रयत्न करताना दिसतात.**

**ज्या पध्दतीने सर्व पालक आपला पाल्य चुकत असतानाही लहानपणी त्यांना टाळ्या वाजवून त्यांच्या चुकांकडे डोळेझाक करत त्यांचा उत्साह वाढवत, त्याचप्रमाणे आजचा हा तरूण आपल्या पालकांना या उत्सवातील देखाव्यांच्या माध्यमातून संदेश देताना दिसेल. तरूणाईचे व भारतातील जनतेने हे नाते असेच दृढ होवो, हीच प्रार्थना.**

'न्यायस्वातंत्र्य समता' हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे,पुणे-४११०५८ येथे छापून सर्व्हे नं. ४/१२ महात्मा फुले वसाहत कोंढवा खुर्द, कमेला पुणे - ४११०४८ येथून प्रकाशित केले.


(या अंकामध्ये छापलेल्या मजकुराशी संपादक / प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद पुणे न्यायकक्षेत). मो. ८५५४८९१२७९

# बाप

'आई' घराचं मांगल्य तर बाप घराचं अस्तित्व असतो ! पण घराच्या या अस्तित्वाला खरंच आम्ही कधी समजून घेतले आहे का? वडिलांचं महत्व असूनही त्यांच्याविषयी जास्त लिहिले जात नाही, बोललं जात नाही. कोणताही व्याख्याता आईविषयी बोलत राहतो. संतमहात्म्यांनी आईचंच महत्व अधिक सांगितलेले आहे. देवादिकांनी आईचेच गोडवे गायले आहेत. लेखकांनी, कवींनी आईचं तोंड भरून कौतुक केलेलं आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली जाते, पण बापाविषयी कुठेच फारसं बोललं जात नाही. काही लोकांनी बाप रेखाटला पण तोही तापट, व्यसनी, मारझोड करणाराच ! समाजात एक-दोन टक्के असे बाप असतीलही पण चांगल्या वडिलांबद्दल काय?

आईकडे अश्रुचे पाट असतात, तर बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते, पण सांत्वन वडिलांनाच करावे लागते आणि रडणाऱ्यांपेक्षा सांत्वन करणाऱ्यांवरच जास्त ताण पडतो. कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते ना? पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळत राहते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आमच्या लक्षात राहते पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आम्ही किती सहज विसरून जातो! सर्वांसमोर आई मोकळेपणाने रडू शकते पण रात्री उशीत तोंड खुपसून मुसमुसतो तो बाप असतो.

आई रडते, वडिलांना रडता येत नाही, स्वतःचा बाप वारला तरीही त्याला रडता येत नाही. कारण छोट्या भावंडांना जपायचं असतं, आई गेली तरीही रडता येत नाही, कारण बहिणींचा आधार व्हायचं असतं. पत्नी अर्ध्यावरच साथ सोडून गेली तर पोरांसाठी अश्रूंना आवर घालावा लागतो. जिजाबाईंनी 'शिवबा' घडविला असं अवश्य म्हणावं पण त्यावेळी शहाजीराजांची ओढाताण सुद्धा लक्षात घ्यायला हवी. देवकीचं, यशोदेचं कौतुक अवश्य करावं पण पुरातून पोराला डोक्यावर घेऊन जाणाऱ्या वासुदेवालासुद्धा लक्षात ठेवायला हवंय. 'राम' हा कौसल्येचा पुत्र अवश्य असेल पण पुत्रवियोगाने तडफडून मरण पावला तो पिता दशरथ होता. वडिलांच्या टाचा - झिजलेल्या चपलांकडे बघितले की प्रेम कळतं, त्यांचे फाटके बनियनला बघितले की कळतं ''आमच्या नशिबाची भोकं''



त्यांच्या बनियन पडलीत. त्याचा दाढी वाढलेला चेहरा त्यांची काटकसर दाखवितो. मुलीला गाऊन घेतील, मुलाला जीन्सची पॅन्ट घेतील पण स्वतः मात्र जुनी पॅन्टच वापरतील. मुलगा सलूनमध्ये वीस-पंचवीस रुपये खर्च करतो. मुलगी पार्लरमध्ये खर्च करते, पण त्याच घरातला बाप दाढीचा साबण संपला म्हणून आंघोळीच्या साबणाने दाढी करतो. अनेकदा तो नुसतं पाणी लावून दाढी करतो. बाप आजारी पडला तरी लगेच दवाखान्यात जात नाही, तो आजाराला घाबरत नाही, पण डॉक्टर महिना आराम करायला लावतील याची त्याला भीती वाटते कारण पोरीचं लग्न, पोरांचं शिक्षण बाकी असतं. घरात दुसरे उत्पन्नाचे साधन नसते. तरीही मुलाला मेडिकल, इंजिनिअरींगला प्रवेश घेतला जातो.


ओढाताण सहन करून मुलाला दर महिन्याला पैसे पाठविले जातात, पण सर्वच नसली तरी काही मुले अशीही असतात की जे तारखेला पैसे येताच मित्रांना परमीट रूममध्ये पार्ट्या देतात आणि ज्या वडिलांनी पैसे पाठविले त्याच बापाची टिंगल करतात.

एकमेकांना वडिलांच्या नावाने हाका मारतात. ज्या घरात बाप आहे त्या घराकडे वाईट नजरेने कोणी बघू शकत नाही कारण घरातला कर्ता जिवंत असतो. तो जरी काहीही करत नसला तरीही तो त्या पदावर असतो आणि घरच्यांचं कर्म बघत असतो, सांभाळत असतो. कोणाचा मुलगा होणं टाळता येत नाही पण बाप होणं टाळता येतं पण बाप कधीच बाप होण्याचं टाळत नाही. आईच्या असण्याला अथवा आई होण्याला बापामुळेच अर्थ असतो.


कोणत्याही परीक्षेचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते कारण ती जवळ घेते, कवटाळते, कौतुक करते पण गुपचूप जावून पेढ्यांचा पुडा आणणारा बाप कोणाच्याच लक्षात राहत नाही. पहिलटकरणीचं खूप कौतुक होतं पण हॉस्पिटलच्या आवारात अस्वस्थपणे वावरणाऱ्या त्या बाळाच्या बापाची कोणीही का दखल घेत नाही?चटका बसला, ठेच लागली, फटका बसला तर आईगं! हा शब्द बाहेर पडतो पण रस्ता पार करताना एखादा ट्रक भरधाव वेगाने मागे येऊन अचानक थांबतो तेव्हा मात्र बापरेऽऽ हाच शब्द बाहेर पडतो. छोट्या संकटासाठी आई चालते पण मोठमोठी वादळं पेलताना बापच आठवतो, काय पटतयं ना? कोणत्याही मंगल प्रसंगी घरातली सर्वजण जातात, पण मयताच्या प्रसंगी बापालाच जावे लागते. कोणताही बाप श्रीमंत मुलीच्या घरी जास्त जात नाही पण गरीब लेकीच्या घरी उभ्या उभ्या का होईना चक्कर मारतो.

तरुण मुलगा उशीरा घरी येतो तेव्हा बापच जागा असतो. मुलाच्या नोकरीसाठी साहेबांपुढे लाचार होणारा बाप, घरच्यांसाठी स्वतःच्या व्यथा दडपणारा बाप...

खरंच किती 'ग्रेट' असतो ना? वडिलांचं महत्त्व कोणाला कळतं? लहानपणीच वडील गेल्यावर ज्यांना अनेक जबाबदाऱ्या खूप लवकर पेलाव्या लागतात, त्यांना एका एका गोष्टीसाठी तरसावं लागतं. वडिलांना खऱ्या अर्थाने समजून घेते - ती म्हणजे घरातील मुलगी ! सासरी गेलेल्या अथवा घरापासून दूर असलेल्या मुलीला बापाशी - वडिलांशी फोनवर बोलताना बापाचा बदललेला आवाज एका क्षणात कळतो. ती अनेक प्रश्न विचारते. कोणतीही मुलगी स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून बाप म्हणेल तेव्हा विवाहाच्या बोहल्यावर चढते. मुलगी बापाला जाणते, जपते, इतरांनी सुद्धा असंच आपल्याला जाणावं हीच बापाची किमान अपेक्षा असते.



## हास्यविनोद



● खेडेगावातील हॉटेलात बसलेला शहरी बाबू तिथल्या वेटरला म्हणाला, ''काय हे ! किती माश्या आहेत हॉटेलात ! मला माश्यांचा फार तिरस्कार वाटतो.''

वेटर म्हणाला, ''ठिक आहे साहेब. तुम्हाला कसल्या माश्या आवडतात. ते सांगून ठेवा. पुढच्या वेळी तसल्या माश्या मागवून ठेवू.''

● कोणी काही वस्तू दिली. तर त्यांचे आभार मानायचे. Thank you म्हणायचे असे आईने बाळूला सांगून ठेवले होते. आई बाळूला घेऊन बाजारात गेली होती तेव्हा दुकानदाराने बाळूच्या हातात एक मोसंबी दिली. त्याला Thank you म्हणायची आठवण करायला आई म्हणाली,''बाळू, काकांना काय म्हणायचे बरं, तू विसरलास का ?''

''नाही आई,'' असे म्हणत बाळू काकांकडे वळला व म्हणाला,''मोसंबी सोलून द्या.''

● वामनराव मधूला सांगत होते, अलीकडे माझा विसराळूपणा फारच वाढायला लागला आहे. पाच मिनिटापूर्वीची गोष्टही आठवत नाही म्हणून मी मानसोपचार तज्ञाकडे गेलो.

''मग, त्याने काय केले ?'' मधूने मोठ्या उत्सुकतेने विचारले.

''पहिली गोष्ट म्हणजे त्याने आपली फी Advance मध्ये घेतली.''

# आपल्या कष्टाला सर्वस्व मानून परिस्थितीशी दोन हात करत उद्योजक बनलेले बहुआयामी व्यक्तिमत्व

साप्ताहिक न्यायस्वातंत्र्य समताच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, कला, क्रीडा, साहित्य आदि क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या मुलाखती घेतल्या जातात कोंढवा भागातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक मा. सिराज जैनुद्दीन कुरेशी यांच्याशी संवाद साधण्याचा योग आला. त्यांच्याशी सुसंवाद साधत असताना त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू उलगडत गेले. आपल्या कष्टाला त्यांनी सर्वस्व माणून उत्तुंग भरारी घेत. सामिया चर्मोउद्योग औद्योगिक सोसायटीची मुहर्तमेढ रोऊन, शेकडो बेरोजगार तरूणांना रोजगार मिळवून देण्याची किमया केली. बालपण त्यांचे कष्टात गेले. घरची परिस्थिती बेताचीच होती. त्यामुळे त्यामुळे त्यांना इयत्ता ४ थी पर्यंतचे शिक्षण घेता आले. वयाच्या १५ व्या वर्षी त्यांनी वडिलांना कामात मदत व्हावी म्हणून त्यांच्याबरोबर काम करण्यास सुरूवात केली. अवघ्या १५ वर्षात त्यांनी व्यवसाय करण्याचे सर्व तंत्र आत्मसात करून वयाच्या ३० व्या वर्षी अमिन लेदर वर्क्स ची स्थापना केली. अमिल लेदर वर्क्सच्या माध्यमातून चर्मोउद्योगाला एक वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले.

अमिन लेदर वर्क्सच्या माध्यमातून त्यांनी चामड्यापासून तयार होणारी वादी ज्याचा उपयोग तबला, पखवाज यांच्या बांधणीसाठी होतो. संपूर्ण महाराष्ट्रात वितरीत केली. त्यांच्या मालाला आजही मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

कापलेल्या जनावरांचे चामडे, याला मीठ लाऊन साठा करण्यासाठी जागेची गरज असते. कोंढवा भागातील अद्ययवत पशुवध गृह (स्लॉटर हाऊस) मध्ये त्यांनी मनपाकडे जागेची मागणी केली. गेली ३० वर्षांपासून ते मागणी करत आले आहेत. त्यांना आश्वासनाशिवाय काहीच मिळाले नाही. आजही त्यांनी माघार घेतलेली नाही ते सतत जागेची मागणी करतानाचा पाठपुरावा करताना दिसतात.

अमिन लेदर वर्क्स नंतर त्यांनी सामिया चर्मोउद्योग औद्योगिक सोसायटीची स्थापना करून पुणे शहरातून या उद्योगाला चालना दिली. शहरातील लहान मोठ्या उद्योग करणाऱ्यांना एकत्र करून त्यांचा माल महाराष्ट्राच्या बाहेर, चर्मोउद्योगाचे माहेर असणाऱ्या कलकत्ता, कानपूर, चेन्नईमध्ये एकत्ररित्या पाठविला. तेथून प्रक्रिया होऊन तो माल परदेशात गेल्याचे ते सांगतात. त्यांच्या या कल्पकतेमुळे हा उद्योग करणाऱ्यांना चांगले दिवस आले.

सिराजभाई च्या कार्यशैलीमुळे त्यांचा व्यवसाय भरभराटीला आला. परंपरागत व्यवसाय करणाऱ्यांची संख्या पुणे जिल्ह्यात जवळ जवळ १५ हजार इतकी आहे. हीच संख्या महाराष्ट्रात १५ लाख आहे. गोवंश हत्या बंदी



मा. सिराज जैनुद्दीन कुरेशी
मोबा. : ९४२२०१३९०५

कायदा महाराष्ट्रात लागू झाला आणि हा समाज पत्यांचा बंगला ज्याप्रमाणे कोसळावा त्याप्रमाणे क्षणार्धात अधोगतीला गेल्याचे ते सांगतात.

या उद्योगावर उपजिवीका करणाऱ्यांचे परिवार आज उपासमार भोगत असल्याचे भयावह चित्र आहे. परंपरागत व्यवसाय असल्याने या समाजाने इतर क्षेत्रात प्रगती केल्याचे दिसत नाही. परंपरागत व्यवसायावर गदा आल्याने त्यांना दुसरे काम करण्याचे कौशल्य नाही. शिक्षण नाही. त्यामुळे हा समाज पुरता हतबल झाला असल्याचे सांगून या समाजाला जर सावरायचे असेल व भूकबळीपासून वाचवायचे असेल तर त्यांना शासनाने घरटी, १० लाख रूपये दीर्घ मुदतीचे कर्ज कमीत कमी कागदपत्रात व शुन्य टक्के व्याज दराने द्यावे ही मागणी ते करतात. आमच्या प्रतिनिधींशी चर्चा करताना ही मागणी सरकार दरबारी पोहचवावी असा ते आग्रह धरतात. व येत्या काळामध्ये या मागणीच्या पुर्ततेसाठी जन आंदोलन उभी करण्याची ह्यांची मनिषा आहे.

ही मागणी सरकारने लवकरात लवकर पूर्ण करावी अन्यथा हा समाज पुर्णपणे देशोधडीला लागेल अशी भिती व्यक्त करताना ज्याप्रमाणे महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या करण्याचा निर्णय घेताना दिसतात. त्याचप्रमाणे मुलाबाळाचे उपाशी राहणे हे पाहणे म्हणजे जीवंतपणी मृत्यू होय असे ते मानतात. व सरकार यावर ठोस निर्णय घेऊन या समाजाला जगण्याची एक संधी देतील अशी आशा व्यक्त करताना दिसतात. सिराजभाई आपला व्यवसाय करत असतानाच त्यांचा सामाजिक कार्याकडे जबरदस्त ओढा असल्याचे जाणवते. कोंढवा कमेला परिसरातील सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग त्यांचे कर्तृत्व सांगून जातो.

सम्राट अशोक मित्र संघाच्या वतीने काढण्यात येणाऱ्या मिरवणूकीचे नेतृत्व ते करत आले आहेत. व येथील आजही करताना दिसतात. वाजत गाजत पुणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करणाऱ्या मिरवणूकीच्या ढोली बाजाचा खर्च आजही ते उचलतात. याचबरोबर सार्वजनिक गणेशोत्सवाबरोबर, ईद-ए-मिलादमध्ये सहभागी होऊन धार्मिक सलोखा राहण्याचा ते सतत प्रयत्न करत असतात. परिसरातील, सर्वांच्या मदतीला धावून जाणारे व सर्वोतोपरी सहकार्य करणारे सिराजभाई आपल्या कार्यशैलीने कर्तृत्वाने समाजावर अधिराज्य गाजवताना दिसतात.

आपल्या आनंदाच्या क्षणाबद्दल विचारले असता वयाच्या ३० व्या वर्षी अमीन लेदर वर्क्स च्या माध्यमातून शेकडो कुटुंबाच्या चुली पेटवू शकलो. हे ते आनंदाचा क्षण मानतात. व त्याच चुली गोवंश हत्या बंदी कायदयामुळे विझण्याच्या उंबरठ्यावर असल्याने दुःख होत असल्याचे सांगतात. शासनाने कुरेशी समाजाला घरटी १० लाख रूपये कर्ज मंजूर केल्यास या चुली नक्की पेटतील व विस्थापीत होणाऱ्या मार्गावर असणाऱ्या समाजाला, नवा व्यवसाय करण्याची संधी प्राप्त झाल्यास यासारख्या आनंद दुसरा नाही असे ते सांगतात.

त्यांच्या या कर्तृत्वात त्यांच्या पत्नि फातिमा व त्यांचा मुलगा वसीम यांचा सदैव पाठींबा मिळत असल्याचे ते सांगतात. त्यांच्या या व्यवसायाना त्यांच्या मुलाची साथ मिळत असल्याने ते आनंदित आहेत. त्यांनी झोपडपट्टी रहिवाशी सेवा संघ सोसायटीच्या माध्यमातून गेल्या १० वर्षापासून वसाहतीतील प्रश्नांर मनपाकडे पाठपुरावा व प्रश्न तडीस नेतानाचे कार्य करताना दिसतात.

# राज्यातील १० विमानतळांच्या विकासासाठी विविध सवलती देण्यास मान्यता

मुंबई : केंद्र शासनाच्या नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने जाहीर केलेल्या प्रादेशिक जोड योजनेसाठी (रिजनल कनेक्टीव्हीटी स्कीम) राज्य सरकारचा केंद्र शासनाचे नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्याशी उद्या (दि.२३ ऑगस्ट) सामंजस्य करार करण्यात येणार आहे. या कराराच्या मसुद्यास सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या करारांतर्गत विविध सवलती देण्यात येणार आहेत.

याचबरोबर वस्तू व सेवा कर विधेयकाच्या (जीएसटी) मंजुरीसाठी विधानमंडळाचे २९ ला एक दिवसाचे विशेष अधिवेशन, जीएसटी संदर्भातील विधेयकाच्या अनुसमर्थन प्रस्तावास मान्यता, प्राधिकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या पात्रतेबाबत अधिनियमात सुधारणेसाठीचा अध्यादेश पुनर्प्रख्यापित करण्यास मान्यता, सहकारी संस्थांच्या मंडळावर कर्मचाऱ्यांना वाढीव प्रतिनिधित्व देण्यासाठीचा अध्यादेश पुनर्प्रख्यापित करण्याचा निर्णय, सहकारी बँकांच्या संचालकांना अपात्र ठरविण्यासाठीचा अध्यादेश पुनर्प्रख्यापित करण्याचा निर्णय, बाजारपेठेचे पर्याय खुले करण्यासाठी अध्यादेश पुनर्प्रख्यापित करणे, असे



निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आले.

राष्ट्रीय नागरी विमान वाहतूक धोरणात देशातील वेगवेगळे प्रदेश विमानसेवेने जोडण्यासाठी आर्थिक मदत देण्यासह त्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी केंद्र सरकारने या धोरणांतर्गत प्रादेशिक जोड योजना (रिजनल कनेक्टीव्हीटी स्कीम) प्रस्तावित केली आहे. त्याअंतर्गत केंद्र शासनाचे नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्याशी महाराष्ट्र सरकार २३ ऑगस्ट रोजी सामंजस्य करार करणार आहे.

या करारात राज्याकडून द्यावयाच्या सवलती उल्लेखित होणार आहेत. त्यामुळे या कराराच्या मसुद्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील शिर्डी, अमरावती, गोंदिया, नाशिक, जळगाव, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १० शहरातील विमानतळांचा समावेश करण्याची शिफारस राज्य सरकारने केंद्राकडे केली आहे. सामंजस्य कराराच्या मसुद्यात राज्य शासनाकडून द्यावयाच्या सवलतींबाबतच्या तरतुदी समाविष्ट आहेत.

या योजनेत समाविष्ट असलेल्या विमानतळांसाठी लागणाऱ्या इंधनावरील मूल्यवर्धित कराचा दर १० वर्षासाठी एक टक्का इतका करण्यात येईल, विमानतळांच्या पुनरूज्जीवनासाठी आवश्यक तेवढी जमीन विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येईल, या विमानतळांना रस्ते, रेल्वे, मेट्रो, जलवाहतुकीचे मार्ग आदींनी जोडण्यात येईल, विमानतळांना पोलीस आणि अग्निशामक सेवा निःशुल्क उपलब्ध करून देण्यात येतील. राज्य शासनाकडून या विमानतळांना वीज, पाणी आणि इतर सुविधा भरीव सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्या जातील. या विमानतळांच्या प्रादेशिक मार्गावर विमानवाहतुकीचा खर्च आणि अपेक्षित उत्पन्न यातील तफावत (Viability Gap) भरून काढण्यासाठी संबंधित विमानतळ परिचालकास (Airport Operator) देय असलेल्या निधीची (Viability Gap Funding-VGF) तरतूद केंद्र सरकार ८० टक्के तर राज्य सरकार २० टक्के या पद्धतीने केली जाईल, आदी सवलतींचा त्यात समावेश आहे. याशिवायही राज्य सरकार अधिक सवलती देऊ शकेल, असे या मसुद्यात आश्वासित करण्यात आले आहे.

# विधानसभा निवडणूक बंदोबस्तात सहभागी...

(पान १ वरून)

आवश्यक आहे. अवैध धंद्यांचा बिमोड करण्यासाठी सर्वांनी मिशन मोडवर काम करण्याचे आवाहन करताना पोलिसांना पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून घरे देण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले. पोलिसांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. पोलिसांसंबंधित प्रस्तावांना तत्काळ मंजूरी देणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दलाचा नावलौकिक कायम राखावा- दीपक केसरकर : भ्रष्टाचाराला प्रतिबंध करण्यासाठी पोलीस दलाने स्वतःहून कारवाई करणे आवश्यक आहे. कायद्याच्या चौकटीत राहून जनतेचे संरक्षण करताना त्याचा दुरुपयोग होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन गृह राज्यमंत्री दीपक केसरकर यांनी केले. राज्याच्या पोलीस दलाचा नावलौकिक आहे. तो कायम राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी अपर मुख्य सचिव श्री. बक्षी, पोलीस महासंचालक श्री. माथूर यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी राज्यातील पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी आपापल्या कार्यक्षेत्राचा आढावा सादर केला. इंडियन पोलीस सर्व्हिस असोसिएशनच्यावतीने पोलीस महासंचालक श्री. माथूर यांनी मुख्यमंत्री सहायता निधीस एक लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्र्यांकडे सुपुर्द केला.

# पत्रकारिता प्रमाणपत्र सोहळा उत्साहात संपन्न!

(पान १ वरून)

सदर अभ्यासक्रमामध्ये प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, डिजिटल मिडीया, वेब मिडिया यांचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रिंट मिडियाचे प्रशिक्षण जेष्ठ पत्रकार मा. अनिल शिंदे तर इलेक्ट्रॉनिक मिडियाचे प्रशिक्षण मा. अनिल कडाळे यांनी दिले. या प्रशिक्षणाचे आयोजन दैनिक आपल्या सम्राटचे संपादक योगेश आल्हाट यांनी केले होते.





मा. शिवराम कांबळे, राजू गायकवाड आणि प्रेरणाज् मिडिया मास कमिन्युकेशन्स चे अनिल कडाळे यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमास साप्ताहिक जनपुण्यकाळचे संपादक काळूराम वाघमारे, मासिक तेजन्यूज टाईम्सचे संपादक साहिल कांबळे, याचबरोबर राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

प्रशिक्षणार्थी सा. न्यायस्वातंत्र्य समताचे प्रतिनिधी म्हणून जबाबदारी देण्यात आली व या सर्वांनी ती स्वीकारली.













## दोन दिवसांत पुणे शहरात ७७ डेंग्यूसदृश रुग्ण

पुणे : डेंग्यूच्या रुग्णांमध्येही चिकुनगुनियासारखे सांधेदुखीचे लक्षण दिसण्याचे प्रमाण वाढले असल्याचे निरीक्षण वैद्यकीय तज्ज्ञ नोंदवत आहेत. तसेच, काही डेंग्यूरुग्णांमध्ये यकृताला सूज येते. त्याचेही प्रमाण यंदा वाढले आहे. गेल्या दोनच दिवसांत पालिकेकडे तब्बल ७७ डेंग्यूसदृश रुग्णांची नोंद झाली आहे. या वर्षी जूनपासूनच शहरातील डेंग्यूसदृश रुग्णांच्या संख्येत वाढ होऊ लागली होती. पालिकेकडे होणाऱ्या रुग्णांच्या नोंदीनुसार जूनमध्ये १४० डेंग्यूसदृश रुग्ण सापडले होते, तर जुलैमध्ये २९५ रुग्ण सापडले होते. चालू महिन्यात आतापर्यंत ३४२ डेंग्यूसदृश रुग्णांची नोंद झाली आहे. त्यातही या आठवड्यात सोमवारी ३५ व मंगळवारी एकाच दिवसांत ४२ डेंग्यूसदृश रुग्ण आढळले आहेत. डेंग्यूच्या लक्षणांमध्ये अथ्रायटिस म्हणजे सांधेदुखीचे लक्षणही वाढल्याचे दिसत असल्याचे संसर्गजन्य रोगांचे तज्ज्ञ डॉ. महेश लाखे यांनी सांगितले. ते म्हणाले, पूर्वी ५ ते १० टक्के डेंग्यूरुग्णांमध्ये सांधेदुखी दिसायची, पण माझ्या पाहण्यात या वर्षी डेंग्यूच्या ४० टक्के रुग्णांमध्ये सांधेदुखी दिसून येत आहे.



यात हातापायाचे लहान सांधे, मनगट, गुडघे यात काही प्रमाणात सूज येते व ते दुखतात. याच प्रकारचे लक्षण चिकुनगुनियातही दिसते व त्यामुळे रोगनिदानात समस्या येतात. रुग्णांना आजाराच्या पहिल्या ३-४ दिवसांत १०३-१०४ च्या आसपास असा तीव्र ताप येतो. अंगावर पुरळ येण्याचे लक्षण यंदा तुलनेने कमी दिसते आहे. त्याऐवजी हाडे दुखणे, अंगदुखी, पाठदुखी व डोकेदुखीबरोबरच घसादुखी व सांधेदुखी ही लक्षणे डेंग्यूसदृश रुग्णांमध्येही दिसत आहेत. अशा रुग्णांच्या डेंग्यू व चिकुनगुनिया अशा दोन्ही चाचण्या केल्या जातात व त्यातील अनेकांमध्ये डेंग्यूची चाचणी पॉझिटिव्ह येते.

काही रुग्णांमध्ये आजाराच्या सुरूवातीला डेंग्यूची चाचणी निगेटिव्ह येऊन नंतर ४-५ दिवसांनी पुन्हा चाचणी केल्यास पॉझिटिव्ह येते, असेही ते म्हणाले.

### डेंग्यूची लक्षणे

तीव्र ताप, अंगदुखी, डोकेदुखी, सांधेदुखी, शरीरातील पाणी खूप कमी होणे ही लक्षणे ४ ते ५ दिवस दिसू शकतात. ताप उतरू लागल्यावर व अंगदुखी कमी होऊन रुग्णाच्या रक्तातील प्लेटलेट काऊंट कमी होऊ लागतो. याच वेळी अंगावर पुरळ येणे व यकृताला सूज येण्यासारखे लक्षण दिसू शकते.

डेंग्यूत होणारी सांधेदुखी मात्र ताप गेल्यानंतरही ७ ते १० दिवस राहात असल्याचे दिसत आहे. काही डेंग्यू रुग्णांमध्ये यकृतावर परिणाम झाल्याचे दिसते व तशा रुग्णांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. डेंग्यू दुसऱ्यांदा झाला असेल (सेकंडरी डेंग्यू) तर प्लेटलेट अधिक कमी होऊ शकतात. पण आता पहिल्यांदा (प्रायमरी) डेंग्यू झाला असतानाही प्लेटलेट खूप कमी झाल्याचे दिसते आहे. सेकंडरी डेंग्यूतील गुंतागुंती प्रायमरी डेंग्यूतही दिसू लागल्या असल्याचे माझे निरीक्षण आहे. अर्थात डेंग्यूत गुंतागुंत होणाऱ्या रुग्णांचे प्रमाण १ टक्क्याहून कमी असते.

## बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क साधा !

१) वैभव विलास बळवंतकर - पिंपरी - ९१३९६१३८०५
२) सुधीर दिवाकर माने - सहसंपादक - ७२७६१३१८५८
३) शरद गुलाब गायकवाड - ताडीवाला रोड - ९८२२४७६४८३
४) विजय के. खरात - ताथवडे - ८३९०३४७८५३
५) राकेश वसंतराव पगारे - चिंचवड - ९६८९११५०६४
६) आदित्य धम्मरक्षक - पुणे मनपा प्रतिनिधी - ९५७९१५०७२७
७) सौ. आशालता महाजन - पिंपळे गुरव - ९४२२५५८१०८
८) क्षितीज गौतम खरात - वडगाव शेरी - ९१५८७६०३९५
९) स्वप्निल धनराज ठाकरे - हडपसर - ८३०८३०१३०७
१०) युसूफ शेख - कोंढवा, कात्रज - ९५४५२८७३३७
११) दिगंबर गायकवाड - बिबवेवाडी - ८७९६०२११४७
१२) रितेश बी. आवळेकर - ८०८७९२९९४७
१३) गणेश भिमराव मगर - माळवाडी - ९५२७६८१९७२
१४) गौरव अशोक इंगुले -(कसबा पेठ)-९०२८४८२२५९ / ९८५००६७४५२
१५) रामेश्वर अर्जुन रच्चा - भवानीपेठ - ९६७३०१४३०३